महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**
पीरबाजार, उस्मानपूरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेल: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.विकाऔ/आस्था-१/२०२३/ 250 दिनांकः- 17 JAN 2023

**::कालमर्यादा::**

२७-०१-२०२३

---::**परिपत्रक**::---

प्रति,

**प्राचार्य**, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद / जालना / अंबड / जिंतूर / हिंगोली / नांदेड / बीड / उस्मानाबाद / पु.ला.शा.तं.लातूर / शा.नि.म.तं.लि.लातूर.

**विषयः-नियमित शासकीय सेवकांच्या नियतकालिक सन-२०२३ बदल्याबाबत...**
**(प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्याता)**

**संदर्भ**:-शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध करण्याकरिता सन-२००५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.-२१.

उपरोक्त संदर्भाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की,शासकीय सेवकांच्या नियतकालिक बदल्याबाबत संदर्भिय अधिनियमान्वये निश्चित केलेल्या धोरणानुसार दि.३१ मे, २०२३ रोजी एकाच पदावर किंवा एकापेक्षा जास्त पदावर एकाच ठिकाणी ३ वर्ष सेवा पूर्ण करणारे **प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांचे नाव आद्याक्षरात न लिहिता संपूर्ण नाव** नमूद करुन माहिती सोबतच्या विहित **प्रपत्र अ,ब,क** मध्ये **खालील सूचना तंतोतंत विचारात घेऊन सादर करावी.**

०१.प्रशासकीय बदलीसाठी वैयक्तिक पसंतीची तीन ठिकाणे कळवावीत. ज्या प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्याता यांनी बदलीसाठी पसंतीची ठिकाणे दिली नाहीत किंवा तीन पेक्षा कमी ठिकाणे नमूद केलीत त्यांची बदली प्रशासकीय दृष्टीने त्या शिवाय अन्यत्र करण्यात येईल, याची जाणीव करुन द्यावी.

०२.ज्या प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची त्यांचे जवळचे नातेवाईकांचे आजारपण व त्यांचे स्वतःचे आजारपणासाठी बदलीची विनंती केली असेल, अशा प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची विनंती बदली अर्जासोबत पर्याप्त वैद्यकीय कागदपत्रे पुरावा म्हणून देणे आवश्यक असून केवळ एका प्रमाणपत्राचे आधारे विनंती बदली विचारात घेतली जाणार नाही. तसेच ज्या अध्यापकांनी विनंती बदलीसाठी अर्ज केले आहेत, अशा अध्यापकांची माहिती व त्यांचे विनंती बदली अर्ज सहपत्रासह आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सादर करण्यात यावेत. पूर्वी विनंती बदलीकरीता अर्ज केलेला असला तरी त्यांनी पुन्हा सोबतच्या प्रपत्रात माहिती सादर करणे आवश्यक आहे. संचालनालयास थेट अर्ज सादर करु नये. संचालनालयास थेट अर्ज सादर केल्यास किंवा प्रस्तावाच्या विहित मुदतीनंतर स्वतंत्रप्रणे प्राप्त झालेला अर्ज विचारात न घेता सदर अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील, असे संबंधितांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे. तसेच दि.३१/१२/२०२२ पूर्वी सन-२०२३ मध्ये बदलीकरीता संचालनालयास सादर केलेल्या विनंती अर्जाचा विचार केला जाणार नसल्याची बाब संबंधितांच्या लक्षात आणून द्यावी.

**(P.T.O.)**

०३.आपल्या संस्थेत कार्यरत असलेल्या अध्यापकांपैकी ज्या अध्यापकांच्या बाबतीत विद्यार्थ्यांच्या तक्रारी आहेत अथवा त्यांच्या शैक्षणिक संपादणुक अहवाल प्रतिकूल आहेत, अशा प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची नावे सुध्दा कळवून त्यांची बदली करणे आवश्यक आहे किंवा कसे? याबाबत आपले स्पष्ट मत / अभिप्राय आवश्यक त्या कागदपत्रासहित (पुराव्यासह) कळविण्यात यावीत.

०४.संस्थाप्रमुखांनी शिफारशीसह सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने बदल्याबाबत निर्णय घेतल्यानंतर बदली केलेल्या काही प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची बदली रद्द करण्याबाबत संस्थाप्रमुखाकडून विनंती करण्यात येते. म्हणून याबाबत आपणास सूचित करण्यात येते की, संदर्भिय बदली कायद्याचे अवलोकन करुन बदली पात्र प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची बदली करावयाची नसल्यास त्यांचे ठोस समर्थन आवश्यक त्या कागदपत्रासहित देऊन तशी शिफारस करण्यात यावी. याबाबत बदल्या झाल्यानंतर आपल्याकडून कोणतीही शिफारस आल्यास विचारात घेतली जाणार नाही.

०५.बदलीपात्र प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यांत्याची पाल्य शैक्षणिक वर्षे २०२३-२४ मध्ये १० वी किंवा १२ वीत शिकत असल्याचे कारणास्तव एक वर्षासाठी बदली न करण्याची शिफारस असल्यास तसे स्पष्टपणे नमूद करुन त्याबाबतची कागदपत्रे प्रस्तावासोबत पुराव्याकरीता जोडण्यात यावी.

०६.जे बदली पात्र प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्याता आहेत, त्यांचे नाव आद्याक्षरात न लिहिता संपूर्ण नाव नमूद करण्यात यावे. **( जसे-स्वतःचे नाव,वडिलांचे नाव तद्नंतर आडनाव यानुसार)**

०७.जे बदलीपात्र प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्याता नजिकच्या कालावधीत **डिसेंबर-२०२३** पूर्वी सेवानिवृत होत आहेत, अशा अध्यापकांच्या नावासमोर ठळक अक्षरात अभिप्राय देण्यात यावा.

०८.जे प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्याता बदलीसाठी राजकीय दबाव आणतील अशा अध्यापकांवर प्रचलित शासन नियमानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदर बाब वार्षिक गोपनीय अहवालात नमूद करण्यात येईल, ही बाब आपल्या अधिपत्याखालील संस्थेतील प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांच्या निदर्शनास आणावी.

०९.संदर्भीय अधिनियमात दिलेल्या सर्व तरतूदी व दि.२८/०४/२०१५च्या विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप नियमावली-२०१० मधील तरतूदी विचारात घेऊन त्या अनुषंगाने बदल्याची माहिती दिल्याचे तसेच सोबतच्या विवरणपत्रातील माहिती अचूक, सत्य व परिपूर्ण असल्याचे आपण प्रमाणित करुन घ्यावी.

१०.जे अध्यापक इतर आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत, त्या सर्व अध्यापकांची माहिती मूळ आस्थापनेवरुन सादर करावी.

११.दि.०८/०५/२०१५ च्या संवर्ग विभाजनाच्या निर्णयानुसार ज्या अध्यापकांच्या नियुक्त्यांना १ वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे, अशा अध्यापकांच्या नावासमोर **#** असे चिन्हांकित करावे.

१२.एका अध्यापकांच्या माहितीसाठी एकच ओळ (**Row**) वापरावी. **Multiple Lines** मध्ये माहिती देवू नये. (**Alt + Enter** चा वापर करावा.)

१३.ज्या संस्थांमध्ये द्वितीय पाळीची पदे मंजूर आहेत. परंतु अद्याप द्वितीय पाळी सुरु नसल्यास द्वितीय पाळीतील पदे दर्शवून तसे स्पष्टपणे नमूद करावे. तसेच द्वितीय पाळी बंद केली असल्यास तसे नमूद करुन पदे दर्शविण्यात यावीत. **(विवरणपत्र-ड)**

१४.अध्यापकांची माहिती दर्शविताना सध्या जे ज्या पदावर कार्यरत आहेत, त्या पदावरील रुजू दिनांकापासूनची माहिती **प्रपत्र –क** मधील रकाना क्र.१९ मध्ये दर्शविण्यात यावी.

**(P.T.O.)**

१५.सोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्र-ड मध्ये आपले संस्थेत कार्यरत असलेल्या अध्यापकांपैकी **असाधारण रजा / प्रसुती रजा / बालसंगोपन रजा / प्रतिनियुक्तीवर** असल्यास त्यांची नावे दर्शविण्यात यावी. त्याशिवाय शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये आपले संस्थेतील सदर विद्याशाखेत **प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या** सुध्दा दर्शविण्यात यावी.

१६.आपल्या संस्थेतील नियमित नियुक्तीने कार्यरत असलेल्या सर्व अध्यापकांची माहिती सोबतच्या **प्रपत्र-क** मध्ये **विद्याशाखानिहाय व सेवाज्येष्ठतेनुसार- DD-MM-YYYY** या तारखेच्या **Format** मध्ये तारीख नमूद करताना (-) शिवाय इतर चिन्ह वापरु नये. (**उदा.- 22-11-2022**) प्रपत्र अ,ब व क मध्ये दर्शविलेल्या उदाहरणाप्रमाणे माहिती **Sakal Marathi** या फॉन्ट मध्ये **New Microsoft Excel Worksheet** या नमुन्यातील विहित प्रपत्रात पाठवावी. तसेच सदर माहिती अचूक या कार्यालयास **Hard Copy** दोन प्रतीत व **Soft Copy** या कार्यालयाच्या **roaurangabad@dtemaharashtra.gov.in** या ई-मेल आयडीवर **दि.२७/०१/२०२३** पुर्वी निश्चितपणे पाठविण्याची कार्यवाही करावी. बदल्याचे प्रस्ताव सादर करताना कोणत्याही प्रकारची चूक होणार नाही, याची संस्थाप्रमुखांनी गांभिर्याने दक्षता घ्यावी.

**सहपत्रे:- वरीलप्रमाणे.**

(उमेश नागदेवे)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत:-या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना त्वरीत संकेतस्थळावर अपलोड करण्यास्तव.

प्रपत्र अ

## शिक्षकीय संवर्ग व्यवस्थेने प्रशासकीय पदावर ३ (तीन) वर्षापेक्षा जास्त कालावधी कार्यरत अध्यापकांच्या प्रशासकीय बदलीसाठी

### (प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्याता)

| अ.क्र | शासकीय सेवकाचे नाव | पदनाम | विद्याशाखा | मूळ वेतन/ वेतन पे मॅट्रिक्स/ लेव्हल | जन्मतारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्तीचा प्रकार पदोन्नती / नामनिर्देशन | सध्याच्या पदाचा नियमीत नियुक्तीचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेचे नाव | सध्याच्या संस्थेत कार्यरत असल्याचा दिनांक | अन्यत्र प्रतिनियुक्ती असल्यास त्या संस्थेचे नाव व कालावधी | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकूण सेवा कालावधी (नक्षलग्रस्त / आदिवासी भागात कार्यरत स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा (दि.३१.०५.२०23 ~~२२~~पर्यंत) | प्रशासकीय बदलीसाठी वैयक्तिक पसंतीची तीन ठिकाणे | विनंती बदली असल्यास विनंती बदलीचे ठिकाण | विनंती बदलीसाठीचे सविस्तर कारण व त्याबाबतची समर्थनीय कागदपत्रे ठिकाण | तक्रारीमुळे बदली करणे अथवा अन्य कारणामुळे बदली न करणे इत्यादी अपेक्षित असल्यास त्याबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय | सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मधील तरतूदीच्या अनुषंगाने संस्था प्रमुख / सहसंचालक यांची शिफारस | कार्यरत असलेल्या पदावर यापूर्वी विविध संस्थेतील सेवाकाल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| १ | श्री. अ ब क | अधिव्याख्याता | स्थापत्य | ५६१०० Level १A | ०३-०४-१९८२ | ३०-०४-२०४२ | नामनिर्देशन | ०४-१२-२००७ | शासनि उस्मानाबाद | ०१-०८-२०१२ | | १० वर्ष १० महिने | पुणे कोल्हापूर कराड | पुणे कोल्हापूर कराड | | | | शासनि औरंगाबाद दि.०४-१२-२००७ ते ३१-०७-२०१२ (४ वर्ष ८ महिने) शासनि उस्मानाबाद दि. ०१-०८-१२ से आजपर्यंत (१० वर्ष १० महिने) |

* संबंधित अध्यापकांच्या सध्याच्या पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून आजतागायत कार्यरत असलेला सेवाकाळाचा तपशील संस्थानिहाय अचूक दिनांकासह रकाना क्रमांक १९ मध्ये दर्शविण्यात यावा.

सहसंचालक, विभागीय कार्यालय, यांची स्वाक्षरी व शिक्का

प्रपत्र ब

# शिक्षकीय तदर्थ व्यवस्थेने प्रशासकीय पदावर ३ ( तीन ) वर्षापेक्षा कमी कालावधी कार्यरत अध्यापकांच्या विनंती / मान्यवरांच्या शिफारशीसह माहिती

## ( प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्याता )

| अ.क्र | शासकीय सेवकाचे नाव | पदनाम | विद्याशाखा | मूळ वेतन/ वेतन वे मॅट्रिक्स/ लेव्हल | जन्मतारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्तीचा प्रकार पदोन्नती / नामनिर्देशन | सध्याच्या पदावर नियमीत नियुक्तीचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेचे नाव | सध्याच्या संस्थेत कार्यरत असल्याचा दिनांक | अन्यत्र प्रतिनियुक्ती असल्यास त्या संस्थेचे नाव व कालावधी | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकुण सेवा कालावधी ( नक्षलग्रस्त / आदिवासी भागात कार्यरत स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा (दि.३१.०५.2023 ~~२०२२~~पर्यंत) | विनंती बदली असल्यास विनंती बदलीचे ठीकाण | विनंती बदलीसाठी चे तपशिलवार कारण व त्याबाबतची समर्थनिय कागदपत्रे ठिकाण | तक्रारीमुळे बदली करणे अथवा अन्य कारणामुळे बदली न करणे इत्यादी अपेक्षित असल्यास त्याबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय | सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मधील तरतूदीच्या अनुषंगाने संस्था प्रमुख / सहसंचाल कांची शिफारस | कार्यरत असलेल्या पदावर यापूर्वी विविध संस्थेतील सेवाकाल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| १ | श्री. अ ब क | अधिव्याख्याता | स्वयंचल | ५६१०० Level ९A | ०१-०१-१९८१ | ३१-१२-२०४१ | नामनिर्देशन | ३१-१२-२०१० | शातंनि. वाशिम | २८-०८-२०१९ | | २ वर्ष ९ महिने | नांदेड हिंगोली जिंतूर | वृध्द वडीलांच्या उपचाराक सेता व स्वग्राम असल्याकारणाने | | | शातंनि उस्मानाबाद दि.३१-१२-२०१० ते २७-०८-२०१९ (७ वष ८ महिने) शातंनि वाशिम दि.२८.०८.२०१९ ते आजपर्यंत ( २ वर्ष ९ महिने ) |

संबंधित अध्यापकांच्या सध्याच्या पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून आजतागायत कार्यरत असलेला सेवाकालाचा तपशील संस्थानिहाय अचुक दिनांकासह रकाना क्रमांक १८ मध्ये दर्शविण्यात यावा.

## प्रपत्र क

### संस्थेत कार्यरत सर्व अध्यापकांची सविस्तर माहिती

| अनु. क्र. | शासकीय सेवकाचे संपूर्ण नाव | पदनाम | विद्याशाखा | मूळ वेतन/ वेतन पे मॅट्रिक्स/ लेव्हल | जन्म तारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सध्याच्या पदावर नियमित नियुक्तीचा प्रकार नामनिर्देशन / पदोन्नती | सध्याच्या पदावर नियमित नियुक्तीचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेचे नाव | सध्याच्या संस्थेत कार्यरत असल्याचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकूण सेवा कालावधी (नक्षलग्रस्त / आदिवासी भागात कार्यरत स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा दि.३१.०५.२०२३ पर्यंत) | रकाना क्र. ११ पैकी विनंती वरून अन्यत्र प्रतिनियुक्तीचा कालावधी | प्रशासकीय बदलीसाठी वैकल्पिक पसंतीची तीन (३) ठिकाणे | विनंती बदलीसाठी पसंतीची तीन (३) ठिकाणे | विनंती बदलीसाठी तपशीलवार कारण व त्यांबाबतची समर्थनीय कागदपत्रे | तक्रारीमुळे बदली करणे अथवा अन्य कारणामुळे बदली न करणे इ. अपेक्षित असल्यास त्याबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय | सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१ मधील तरतुदींच्या अनुषंगाने संस्थाप्रमुख / सहसंचालकांची शिफारस | कार्यरत असलेल्या विविध पदावर यापूर्वी विविध संस्थेतील संस्था निहाय सेवाकाळ पदनाम / संस्था / कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| १ | श्री. अ क क | अधिव्याख्याता | स्थापत्य | ५६१०० Level ९A | ०३-०४-१९८२ | ३०-०४-२०४२ | नामनिर्देशन | ०४-१२-२००७ | शासनि उस्मानाबाद | ०१-०८-२०१२ | ९ वर्ष १० महिने | --- | पुणे कोल्हापूर कराड | पुणे कोल्हापूर कराड | | | | शासनि औरंगाबाद दि.०४-१२-२००७ ते ३१-०७-२०१० (३ वर्षे ८ महिने) शासनि उस्मानाबाद दि. ०१-०८-१२ ते आजपर्यंत (दि. ९ वर्षे ९ महिने) |

* संबंधित अध्यापकांच्या सध्याच्या पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून आजतागायत कार्यरत असलेला सेवाकालावा तपशील संस्थानिहाय अचूक दिनांकासह रकाना क्रमांक १९ मध्ये दर्शविण्यात यावा.

| |
|---|
| माहिती तयार करताना Sakal Marathi या Font चा वापर करावा अन्य कोणत्याही Font मध्ये माहिती पाठवू नये व माहिती Excel मध्ये सादर करावी. |
| विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अधिपत्याखालील संस्थांची माहिती अचूक असल्याची खातरजमा करून एकत्रित विभागप्रमुख व अधिव्याख्याता यांची विद्याशाखानिहाय माहिती सादर करावी. संस्थेकडून आलेली माहिती सादर करू नये. |
| एका अध्यापकाच्या माहितीसाठी एकच ओळ वापरावी. Multipal Lines मध्ये माहिती देवू नये. (Alt+Enter चा वापर करावा) |
| अध्यापकांचे संपूर्ण नाव देण्यात यावे |
| तारीख नमूद करताना DD-MM-YYYY या Format मध्ये नमूद करावी. तारीख नमूद करताना - शिवाय कोणतेही इतर चिन्ह (/, .) वापरू नये. |
| ज्या संस्थांमध्ये द्वितीय पाळीची पदे मंजूर आहेत परंतु द्वितीय पाळी सुरू नसल्यास द्वितीय पाळीतील पदे दर्शवून तसे स्पष्टपणे नमूद करावे. |
| दिनांक ०८-०५-२०१५ च्या संवर्ग विभाजनाच्या शासन अधिसूचनेनुसार ज्या अध्यापकांच्या नियुक्त्यांना १ वर्षापेक्षा कमी कालावधी झालेल्या आहे अशा अध्यापकांच्या नावासमोर # चिन्ह दर्शवावे |
| अध्यापकांची माहिती दर्शविताना सध्या ते ज्या पदावर कार्यरत आहेत त्या पदावरील रुजू दिनांकासूनची माहिती प्रपत्र क मधील रकाना क्रमांक २१ मध्ये दर्शवावी |

१९

### विवरणपत्र - ड

संस्थेचे नाव :

| अ.क्र. | विद्याशाखा | मंजूर पदे | | | भरलेली पदे | | | रिक्त पदे | | | कार्यरत अध्यापकाचे संपूर्ण नाव | कार्यरत अध्यापकांपैकी असाधारण रजा/ प्रसूती रजा/ बालसंगोपन रजा/ प्रतिनियुक्तीवर असल्यास त्यांची नावे | शैक्षणिक वर्ष २०२2-23 मध्ये सदर विद्याशाखेत प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम पाळी | द्वितीय पाळी | एकूण | प्रथम पाळी | द्वितीय पाळी | एकूण | प्रथम पाळी | द्वितीय पाळी | एकूण | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | | |
| | | | | | | | | | | | | | |

(प्रपत्र ड संस्थानिहाय सादर करावे. ज्या संस्थांमध्ये द्वितीय पाळीची पदे मंजूर आहेत परंतू अद्याप तेथे द्वितीय पाळी सुरू झाली नसल्यास द्वितीय पाळीची पदे दर्शवून तसे स्पष्टपणे नमूद करावे. तसेच द्वितीय पाळी बंद केली असल्यास तसे नमूद करून पदे दर्शविण्यात यावीत.)